**महत्वाचे पत्र**

जा.क्रं/कृ.यां.उपअ/भाग-२/२०१४-१५/२८/गुनि-५/२०१५
कृषि आयुक्तालय; महाराष्ट राज्य, पुणे- ४११ ००१,
दिनांक : ४ /०२/२०१५

प्रति,

**१. विभागीय कृषि सहसंचालक --------------(सर्व)**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी --------- (सर्व)**

**विषय- केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या अंमलबजावणीबाबत .....**

सन २०१४-१५ मध्ये राज्यात राबविण्यात येत असलेल्या कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना यापूर्वी निर्गमीत करण्यात आल्या असून त्या विभागाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द केल्या आहेत. सदर अभियानासाठी उपलब्ध निधीसुध्दा बी.डी.एस. प्रणालीद्वारे वितरीत केला आहे. दिनांक ३१/०१/२०१५ रोजी मा. आयुक्त, कृषि यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत काही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी लाभधारकांना खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या औजारांना अनुदान अदायगीबाबत स्पष्ट सुचना देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, सदर कार्यपध्दती आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचनांत स्पष्ट केली आहे. तथापि, याबाबत पुनःश्च सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :-

केंद्रशासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचना (ज्या विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) नुसार ज्या औजारांची केंद्रीय तपासणी संस्था अथवा केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या २९ संस्थांद्वारे तपासणी केलेली आहे व त्यांचे तपासणी अहवाल उपलब्ध आहेत त्याच औजारांना अनुदान अनुज्ञेय आहे. (यादी सोबत सहपत्रीत केली आहे.)

सद्यस्थितीत तांत्रीक समितीने सन २०१३-१४ साठी तपासणी अहवालाच्या छाननी अंती तांत्रीक दृष्टया मान्यता दिलेल्या औजारांचे दर शासन निर्णय क्र.सुकृऔ-२०१३/प्र.क्र.१५८/११अ, दि.२७/०९/२०१३ व शासन निर्णय क्र. सुकृऔ-२०१३/प्र.क्र.१५८/११अे दिनांक १५/०१/२०१४ अन्वये निश्चित करण्यात आले असून त्याचे तपासणी अहवाल क्रमांक व तांत्रीक तपशील शासन निर्णय व त्यानुषंगाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनामध्ये नमुद केला आहे. सदर मार्गदर्शक सुचनासुध्दा विभागाच्या संकेतस्थळावर वर्ष २०१३-१४ मध्ये उपलब्ध आहेत. त्यातील लाभार्थ्याने निवड केलेल्या औजारांना अनुदान अनुज्ञेय राहील. त्याव्यतीरीक्त भारतीय मानक संस्थेचे वैध प्रमाणपत्रधारक औजारांनाही अनुदान अनुज्ञेय राहील.

जी औजारे /उपकरणे शासन निर्णयामध्ये समाविष्ट नाहीत तथापि केंद्र शासनाच्या संस्थांनी तपासली आहेत त्यांची यादी केंद्रशासनाच्या संकेतस्थळावर www.farmech.gov.in वर उपलब्ध आहे. त्यातील औजारे लाभधारकाने पूर्व संमती घेवून खरेदी केल्यास त्याचे मॉडेल व परीपूर्ण तपासणी अहवालाची खात्री करुन व खरेदीबाबत भौतीक खात्री करुन त्यास अनुदान देण्यास हरकत नाही. मात्र, सदर सुविधा केवळ लाभधारकाने पूवसंमती घेवून स्वतः खरेदी केलेल्या औजारांसाठी लागू राहील. त्याप्रकरणी अनुदानाची रक्कम संबंधीत लाभधारकांच्या बॅन्क खात्यावर जमा करावी. अशा प्रकरणी औजारांच्या गुणवत्तेची जबाबदारी वैयक्तीक लाभधारकाची राहील. मात्र, इतर प्रकरणी शासनाने नियुक्त केलेल्या पुरवठा संस्थेकडुन पुरवठा करणे बंधनकारक राहील.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार ज्या प्रकरणी अनुदानाच्या मर्यादेची टक्केवारी व उच्चतम मर्यादा नमुद केली आहे त्या प्रकरणी सदर टक्केवारी किंवा उच्चतम अनुदान मर्यादापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. जेथे अनुदानाची टक्केवारी नमुद केलेली नाही तेथे औजारांची किंमत किंवा उच्चतम अनुदान मर्यादा पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

**सोबत : तपासणी संस्थांची यादी**

**कृषि संचालक (नि. व गुनि)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-०१**

**प्रत :**

**मा. अपर मुख्य सचिव, कृषि व पणन,** कृषि व पदुम विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ — यांना माहितीस्तव सविनय सादर

SMAM Gen Corres

**केंद्र शासनाच्या कृषि व सहकार विभागाने कृषि यंत्र सामुग्री औजारे/उपकरणे तपासणी अहवाल देण्यासाठी मान्यता दिलेल्या संस्थांची यादी.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|
| | **अ) केंद्रीय तपासणी संस्था** |
| १ | सेंट्रल फार्म मशिनरी ट्रेनिंग ॲन्ड टेस्टींग इन्स्टीट्युट, बुधनी, मध्यप्रदेश |
| २ | नॉर्दन रिजनल ट्रेनिंग ॲन्ड टेस्टींग इन्स्टीट्युट |
| ३ | सर्दन रिजनल ट्रेनिंग ॲन्ड टेस्टींग इन्स्टीट्युट |
| ४ | नॉर्थ इर्स्टन रिजनल ट्रेनिंग ॲन्ड टेस्टींग इन्स्टीट्युट |
| | **ब) केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या इतर तपासणी संस्था** |
| १ | आचार्य एन. जी. रंगा कृषि विद्यापीठ, हैद्राबाद, आन्ध्रप्रदेश |
| २ | कृषि अभियांत्रीकी विभाग, राजेंद्र कृषि विद्यापीठ, पुसा, बिहार |
| ३ | राज्यस्तरीय कृषि औजारे तपासणी केंद्र, कृषि अभियांत्रीकी संचालनालय, कृषि विभाग, रायपुर छत्तीसगड |
| ४ | कृषि अभियांत्रीकी विभाग,आय ए आर आय, नवी दिल्ली |
| ५ | कृषि अभियांत्रीकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, जुनागड कृषि विद्यापीठ, गुजरात |
| ६ | कृषि अभियांत्रीकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, चौधरी चरणसिंग कृषि विद्यापीठ हिस्सार, हरियाणा |
| ७ | शेर-ए-काश्मीर कृषि शास्त्र व तंत्रज्ञान विद्यापीठ, श्रीनगर, जम्मु काश्मीर |
| ८ | बिरसा कृषि विद्यापीठ, रांची, झारखंड |
| ९ | झारखंड कृषि यंत्रसामुग्री तपासणी व प्रशिक्षण केंद्र, रांची, झारखंड |
| १० | कृषि शास्त्र विद्यापीठ, बेंगलोर, कर्नाटक |
| ११ | कृषि अभियांत्रीकी महाविद्यालय, रायचुर, कर्नाटक |
| १२ | कृषि औजारे तपासणी केंद्र, केरळ कृषि विद्यापीठ, केरळ |
| १३ | सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ ॲग्रीकल्चरल इंजिनिअरींग, भोपाळ, मध्यप्रदेश |
| १४ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर |
| १५ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, जि. अकोला |
| १६ | डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी |
| १७ | डॉ. वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी |
| १८ | कृषि अभियांत्रीकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, ओडीसा कृषि विद्यापीठ, भुवनेश्वर ओडीसा |
| १९ | राज्यस्तरीय कृषि औजारे तपासणी व प्रशिक्षण केंद्र, भुवनेश्वर, ओडीसा |
| २० | कृषि अभियांत्रीकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पंजाब कृषि विद्यापीठ,लुधियाना, पंजाब |
| २१ | कृषि औजारे तपासणी व प्रशिक्षण केंद्र, स्वामी केशवानंद राजस्थान कृषि विद्यापीठ बिकानेर, राजस्थान |
| २२ | कृषि तंत्रज्ञान व अभियांत्रीकी महाविद्यालय,कृषि विद्यापीठ, उदयपुर, राजस्थान |
| २३ | कृषि अभियांत्रीकी व काढणी पश्चात तंत्रज्ञान महाविद्यालय,राणीपुर, गंगटोक,सिक्कीम |
| २४ | तामीळनाडु कृषि विद्यापीठ, कोईमतुर, तामीळनाडु |
| २५ | राज्यस्तरीय कृषि औजारे तपासणी व प्रशिक्षण संस्था, लखनौ, उत्तरप्रदेश |
| २६ | सॅम हीगीनबॉटम कृषि संस्था, अलाहाबाद, उत्तरप्रदेश |
| २७ | तंत्रज्ञान महाविद्यालय गोविंद वल्लभपंत कृषि तंत्रज्ञान विद्यापीठ पंतनगर,उत्तरांचल |
| २८ | कृषि व अन्न अभियांत्रीकी महाविद्यालय, आय आय टी खरगपुर, पश्चिम बंगाल |
| २९ | राज्यस्तरीय कृषि औजारे तपासणी व प्रशिक्षण संस्था, बिधनचंद्र कृषि विद्यापीठ,मोहनपुर, नादीया, पश्चिम बंगाल |

वरील सर्व केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त कृषि औजारे तपासणी संस्थांना तपशील केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर **www.farmech.gov.in** वर उपलब्ध आहे.

**जयंत देशमुख**
कृषि संचालक
(नि. व गु. नि.)

सत्यमेव जयते

ऑफीस : +91 20 2612 7708
फॅक्स : +91 20 2613 1064
इमेल : directorqc@rediffmail.com

अ.शा. पत्र क्र./कृयांउया/२०१४-१५/अनु.वि./गुनि-५/३०/२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
दिनांक : ०४ /०२/२०१५

**विषय : सन २०१४-१५ कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या अंमलबजावणीबाबत --- उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत...**

**प्रिय श्री.**

सन २०१४-१५ मध्ये राज्यात राबविण्यात येत असलेल्या कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना यापूर्वी आपणास पाठविण्यात आल्या असून त्या विभागाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द केल्या आहेत.

याबाबत आपले लक्ष माझ्या दिनांक ७/०१/२०१५ च्या अर्धशासकीय पत्राकडे वेधण्यात येत आहे. शासन निर्णय क्र.कृयांउ-२०१४/प्र.क्र.१२४/४अे दिनांक ३०/१२/२०१४ अन्वये सदर कार्यक्रमास राज्य शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली असून जवळपास ९० टक्के निधी शासनाने मुक्त केला आहे. सदर निधी बीडीएस प्रणालीद्वारे आपणाकडे तात्काळ वर्ग केला आहे.

सदर उपअभियानाखाली उर्वरीत निधी केंद्रशासनाकडून उपलब्ध होण्याच्या दृष्टीने यापूर्वी आपणाकडे वर्ग केलेल्या संपूर्ण निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र (केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा वेगवेगळे) तात्काळ आयुक्तालयास **फॅक्सद्वारे (०२०-२६१३१०६४) व स्कॅन प्रत ई-मेलद्वारे ddaqc5@rediffmail.com वर पाठवावी व पोस्टानेही प्रत सादर करावी.** याबाबत मा. आयुक्त, कृषि यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०१५ रोजी झालेल्या आढावा सभेत दिलेल्या निर्देशानुसार कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५/०२/२०१५ पूर्वी आपले उपयोगीता प्रमाणपत्र आयुक्तालयास प्राप्त होईल त्यादृष्टीने कार्यवाही करावी.

सदर उपयोगीता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने उपअभियानांतर्गत भौतीक /आर्थिक साध्याचा मासीक प्रगती अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने विहीत प्रपत्रांचा नमुना सोबत सहपत्रीत केला आहे त्यानुसार माहे जानेवारी २०१५ अखेर मासीक प्रगती अहवाल आयुक्तालयास सादर करण्याची व्यवस्था करावी.

याबाबत पुन्हा स्मरणपत्र देण्याची आवश्यकता भासू नये ही अपेक्षा आहे.

सस्नेह,

आपला स्नेहांकित,

(जयंत देशमुख)

**सोबत — मा.प्र.अ. विहीत प्रपत्रे**

प्रति,

**श्री.**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------------------------ (सर्व)**

प्रत :-

**विभागीय कृषि सहसंचालक ------------------------------ (सर्व)-** यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीस्तव

SMAM Gen Corres

## घटक-३ अनुदानावर कृषि औजारांचा पुरवठा

### प्रपत्र - अ: भौतीक / आर्थीक साध्याचा तपशील

जिल्हा - विभाग - अहवाल महिना –

एकूण आर्थीक तरतुद (रु. लाख)

| केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|
| | | |

(रु. लाख)

| अ.क्र. | औजाराचे तांत्रीक नाव | भौतीक | | आर्थिक | | आर्थिक साध्य विगतवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
| १ | ट्रॅक्टर | | | | | | | |
| २ | पॉवर टिलर | | | | | | | |
| ३ | स्वयंचलीत औजारे* | | | | | | | |
| ४ | ट्रॅक्टरचलीत औजारे* | | | | | | | |
| ५ | मनुष्यचलीत/बैलचलीत औजारे* | | | | | | | |
| ६ | मनुष्यचलीत स्प्रेपंप | | | | | | | |
| ७ | पॉवरचलीत स्प्रेपंप | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

*सदर गटातील औजारांचे नाव नमुद करावे व संख्या द्यावी.

### प्रपत्र - ब: प्रवर्गनिहाय भौतीक / आर्थीक साध्याचा तपशील

जिल्हा - विभाग - अहवाल महिना –

| अ. क्र. | औजाराचे तांत्रीक नाव | भौतीक विगतवारी (संख्या) | | | | आर्थीक विगतवारी (रु. लाख) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज. | सर्वसाधारण | एकूण | अ.जा. | अ.ज. | सर्वसाधारण | एकूण |
| १ | ट्रॅक्टर | | | | | | | | |
| २ | पॉवर टिलर | | | | | | | | |
| ३ | स्वयंचलीत औजारे* | | | | | | | | |
| ४ | ट्रॅक्टरचलीत औजारे* | | | | | | | | |
| ५ | मनुष्यचलीत/बैल चलीत औजारे* | | | | | | | | |
| ६ | मनुष्यचलीत स्प्रेपंप | | | | | | | | |
| ७ | पॉवरचलीत स्प्रेपंप | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | |

*सदर गटातील औजारांचे नाव नमुद करावे व संख्या द्यावी.

## घटक-४ कृषि औजारे बॅन्क स्थापना

## भौतीक / आर्थीक साध्याचा तपशील

जिल्हा - विभाग - अहवाल महिना –

एकूण आर्थीक तरतुद (रु. लाख)

| केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|
| | | |

| अ. क्र. | औजारे बॅन्कचे नाव व पत्ता | लाभधारकाचा प्रवर्ग | बॅन्क प्रकार | पुरवठा केलेल्या औजारांचे नाव | औजारांची एकूण रक्कम | अनुदानाची रक्कम (रु. लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
| | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

टिप-औजारे बॅन्क प्रकार रु. ४ लाख व रु. १० लाख अनुदान मर्यादेनुसार वेगवेगळा तपशील द्यावा.

## कृषि यांत्रीकीकरण उपअभियान भौतीक/ आर्थिक मासिक प्रगती अहवाल

जिल्हा - विभाग - अहवाल महिना –

एकूण आर्थीक तरतुद (रु. लाख)-

| केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|
| | | |

| घटक -३ | | | | | घटक -४ | | | | | आकस्मिक निधी | | | एकुण आर्थिक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भौतीक साध्य | | आर्थिक साध्य | | | भौतीक साध्य | | आर्थिक साध्य | | | केंद्र | राज्य | एकुण | केंद्र | राज्य | एकुण |
| लक्ष | साध्य | केंद्र | राज्य | एकूण | लक्ष | साध्य | केंद्र | राज्य | एकूण | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |